-: प्रेसनोट दिनांक - ०३/०६/२०२१ :-

## आरोपी लोकसेवक श्री. जनार्दन दगडु जाधव, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक व त्यांची पत्नी व गुलगा यांचेविरूध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल.........

---

आरोपी लोकसेवक श्री. जनार्दन दगडू जाधव, पोलीस उपनिरीक्षक(सध्या सेवानिवृत्त), तत्कालीन नेमणूक-आजरा पोलीस ठाणे, कोल्हापूर, रा. प्लॉट नं. ३१, गुरुकृपा बंगला,न्यु पॅलेस छत्रपती पार्क,रमणमळा, कोल्हापूर यांचेविरुध्द लाच प्रकरणी सापळा कारवाईअंती दि. २४/०४/२०१७ रोजी आजरा पोलीस ठाणे गु.र. नं. ४६/२०१७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्हा दाखल झालेनंतर त्यांचे निवासस्थानाची घरझडती घेण्यात आली होती. त्यावरून आरोपी लोकसेवक जाधव यांचे मालमत्तेची उघड चौकशी करणेबाबत मा. पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचेकडुन आदेश प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे आरोपी लोकसेवक जनार्दन जाधव, पोउपनि यांचे मालमत्तेची उघड चौकशी श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे परिक्षेत्र, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली केलेली आहे.

मालमत्तेच्या उघड चौकशीमध्ये श्री. जनार्दन दगडु जाधव यांनी त्यांचे व त्यांचे कुटूंबियांचे नावे त्यांचे ज्ञात उत्पन्नाचे स्त्रोतापेक्षा एकुण ३०,५६,४२६/- रू. अपसंपदा (बेहिशेबी मालमत्ता संपादित) केली असुन त्यांचे प्रमाण ४८.७१ **%** निष्पन्न झाले आहे.

श्री. जनार्दन दगडू जाधव, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक यांनी व त्यांचे कुटूंबियांनी वर नमुदप्रमाणे अपसंपदा धारण केल्याने त्यांचे, त्यांची पत्नी सौ. जयश्री जनार्दन जाधव व मुलगा कु. प्रसाद जनार्दन जाधव यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम १३ (१)(ई) सह १३(२) सह भा.दं.वि.सं.कलम १०९ प्रमाणे श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी सदरची चौकशी पुर्ण करून सरकार तर्फे लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे आजरोजी गुन्हा दाखल केला असुन श्री. जनार्दन दगडु जाधव, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक यांचे घराची व इतर संपादित मालमत्तेची झडती प्रक्रिया सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास हे श्री. युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर हे करीत आहेत.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.